# अभिरुची

**मराठी मंडळ सॅक्रामेंटोचे त्रैमासिक मुखपत्र.**

- प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही.
- लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलांचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील.

## ऑक्टोबर २०१४

### या अंकात



- अध्यक्षीय
- प्रस्तावना- संपादकीय
- ओळख - राजेश व वृषाली परब
- दिवाळी आमच्या-तुमच्या आठवणीतली
- कविता - संदेश
- पाककृती (रेसिपी)
- चुटके, उखाणे, आरोग्य सल्ला
- दिवाळी कंदील कार्यशाळा, कोजागिरी फोटो
- आभार - गणेशउत्सव वर्गणीदार
- आपले प्रायोजक (जाहिरातदार)

# अध्यक्षीय

नमस्कार मंडळी.



अभिरुचीचा दिवाळी अंक आपणा सर्वांच्या हाती देताना अतिशय आनंद होत आहे. ह्या अंकासाठी ज्यांनी मदत केली त्यां सर्वांचे मनापासून आभार! ह्या वर्षी मंडळाने प्रत्येक महिन्यात काहीनाकाही छोट्यामोठ्या प्रमाणावर विविध कार्यक्रम सादर केले. प्रत्येक कार्यक्रमात लहानथोर सर्व अतिशय उत्साहाने सामील झाल्याचे पाहून फार छान वाटले. ह्यावर्षी मंडळात आपण सर्वप्रथम श्री गणेशाची सुंदर मूर्ती आणून गणेश चतुर्थी साजरी केली. मराठमोळ्या पद्धतीच्या पोषाखात लेझीम खेळत ढोल वाजवत गणपतीबाप्पांची मिरवणूक, सुरेख आरास व आनंद मेळावा हे ह्या उत्सवाचे खास आकर्षण ठरले. आपल्या मंडळातील काही कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेऊन गणपतीचे मखर अल्प कालावधीत बनविले. गणेशोत्सवादिवशी जेमतेम एका तासात सर्वांनी गणपतीची आरास, मखराची मांडणी आणि सजावट व संपूर्ण हॉलला पताका लावून कार्यक्रम सुरु करण्यास हातभार लावला. विशेषतः प्रथमच सॅक्रामेंटो स्टेट विद्यापिठाचे विद्यार्थी ह्या कार्यक्रमाला उपस्थित होते व त्यांनीही सजावटीस हातभार लावला. पूजा, आरती, प्रसाद व खास भारतातून आपले स्पॉन्सर mithai4all.com यांनी चितळे बंधूंकडून पाठवलेले आंबा मोदक वाटण्यात आले. कार्यक्रमात मराठी शाळेतील जी मुले परीक्षा उत्तीर्ण झाली, त्यांना मेडल व सर्टिफ़िकेट देउन त्यांचे कौतुक करण्यात आले. प्रथमच ह्या वेळेस आपणापैकी बऱ्याच मंडळीनी सढळ हस्ते वर्गणी देऊन मंडळाला आर्थिकदृष्ट्या हातभार लावला. त्या सर्वांचे मनापासून आभार (सर्व देणगीदारांची नावे आम्ही ह्या अंकात प्रकाशित करीत आहोत). मराठी मंडळाच्या कारकिर्दीत काही अविस्मरणीय क्षण दिल्याबद्दल गणराया तुझे शतशः आभार! अशा विलोभनीय गणेशोत्सावातील काही क्षणचित्रे येथे पहा.



गणेशोत्सवापाठोपाठ आणखी दोन कार्यक्रम सादर करण्यात आले. एक म्हणजे कोजागिरी पौर्णिमा आणी दुसरा कंदील बनविणे व पणत्या रंगविण्याची कार्यशाळा. कोजागिरी पौर्णिमेस अगदी आयत्या वेळेस छोट्या प्रमाणावर हा कार्यक्रम करू अशी संकल्पना होती. परंतु एकंदर शंभर लोकांची उपास्थिती व सुमारे पंधरा जणांनी कराओकेसाठी आपली नावे नोंदवली तेव्हा जाणवले की आपल्यातील बहुतांशी लोकांना अशा प्रकारचे कार्यक्रम आवडतात. उपस्थितांनी गाणी, भेळ, मसाला दूध ह्यांचा आस्वाद लुटला व कराओके आणि अंताक्षरी हा कार्यक्रम इतका रंगला की सगळे कसे अगदी छान वाटत होते. कोजागीरीतील काही व्हिडीऑस वेबसाईटवर लवकरच अपलोड करू.

दरवर्षी दिवाळीमध्ये आकाशकंदिल व पणत्यांची कार्यशाळा आयोजित केली जाते. मुलांबरोबर पालकांचा ह्या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणावर सहभाग असतो. मराठी शाळेतील मुलांची, पालकांची मोठ्या संखेने उपस्थिती, कार्यशाळा घरी भरविणे, आकाशकंदिल कसा बनवायचा ते शिकवणे ह्यासाठी केलेले प्रयत्न आणि सर्वांचा उत्साह वाखाणण्यासारखा असतो. ह्या आकाशकंदिल कार्यशाळेची एक झलक इथे पहा.

आपल्या भारतात दिवाळी सणाची चाहूल लागताच घराघरात फराळाचा घमघमाट पसरतो. इथे परदेशात ज्यांना फराळ करता आला नाही अशांना घरगुती फराळाची चव चाखायला मिळावी आणि भारतातील आपल्या

आप्तस्वकीयांना फराळ घरपोच मिळावा यासाठी खास भारतातून आपल्या स्पॉन्सर mitahi4all.com तर्फे फराळ मागवायची सोय आम्ही उपलब्ध करून दिली. मडळातील सध्याच्या व माजी सदस्यांकडून केवळ ८ ते १० नव्हे तर चाळीसहून अधिक फराळाच्या बॉक्ससाठी ऑर्डर्स पाठवण्यात आल्या. ताजा फराळ व लक्ष्मी पूजा साहित्य अगदी



दिवाळीच्या आदल्या दिवशी घरपोच मिळेल अशा अंदाजाने भारतातून पाठविले गेले. प्रत्येकाला त्याच्या मागणीनुसार फराळ मिळाला. सर्वांच्या ऑर्डर्स आम्ही एकाच पत्यावर मागवण्यात आल्यामुळे, तो प्रत्येकास वितरीत करण्यात आला व फराळ माफक दरात उपलब्धही करून देता आला. सर्वांनी फराळाचे व एकंदरीत फराळ मागवण्यासाठी केलेल्या व्यवस्थेचे भरभरून कौतुक केले. समितीच्या काही कार्यकर्त्यांनी त्यासाठी अथक परिश्रम घेतले. लोकांनी उत्तम प्रतिसाद दिला, काहींना घरपोच मिळालेल्या फराळामुळे इतर कामांसाठी वेळ मिळाला, सर्वांचा फराळामुळे दिवाळीचा आनंद द्विगुणीत झाला. आणि चक्क काहींनी पुढच्या वर्षी दिवाळी व पुढील सणासुदीसाठी अशीच व्यवस्था करावी अशी मागणी केली.

आता पुढील कार्यक्रम म्हणजे नोव्हेंबर ८ ला मंडळातर्फे दिवाळीचा कार्यक्रम; दरवर्षी प्रमाणे स्थानिक कलाकारांनी सादर केलेला हा मुख्य कार्यक्रम! मी हया कार्यक्रमास आपणा सर्वांना आग्रहाचे निमंत्रण करतो. दिवाळीच्या फराळाचा व स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घ्या, त्याचबरोबर आपल्या मंडळातील कलाकार मंडळीना प्रोत्साहन द्या. आणि इतर मराठी कुटुंबांसोबत एक अविस्मरणीय दिवाळीची संध्याकाळ घालवा. म्हणजे खऱ्या अर्थाने दिवाळी सण साजरा होईल.



गणपती, दिवाळी व इतर सर्व कार्यक्रम आयोजन व व्यवस्थापन करण्यासाठी ज्यांनी मेहनत घेतली त्यांचे मनापासून आभार!

मला इथे जे Mylapore/Nationwide च्या श्री. जय जयरामन यांनी फेसबुकवर मराठी मंडळबद्दल दिलेले मत नमूद करावेसे वाटते

"I must tell you folks that the MMSAC is probably the only organization in Sacramento where everything is planned meticulously. Nothing is left to chance. People RSVP well ahead of time. Good job."

Mr. Jay Jayaraman (Mylapore/Nationwide)

आतापर्यंत सर्व कार्यक्रमांना भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल धन्यवाद! तुमच्या प्रतिसादांवरच पुढील कार्यक्रमाची आखणी ठरवली जाते. डिसेंबर महिन्यात मराठी चित्रपट आणण्याचा आमचा विचार आहे तर जानेवारीमध्ये संक्रांत साजरी करण्याचा मानस आहे.

अजून बरेच काही लिहावेसे वाटते. पण इथे तात्पुरता निरोप घेतो. दिवाळीच्या कार्यक्रमात भेटूच!

सर्व मराठी परिवारांना २०१४ समितीतर्फे शुभ दीपावली आणि येणाऱ्या वर्षाच्या खूप खूप शुभेच्छा!

विक्रांत सावंत (अध्यक्ष, मराठी मंडळ सॅक्रामेंटो)

## प्रस्तावना - संपादकीय

 अजित नातू

नमस्कार मंडळी.

| | |
|---|---|
| आली आली दिवाळी | दूरदेश जरी असे भाळी |
| चिवडा, लाडू अन चकली | जपे संस्कृती मराठमोळी |
| सगे सोयरे मित्र मंडळी | बहिण भावास ओवाळी |
| पणत्या कंदील मने रंगली | हृदयी आठवणी जिव्हाळी |

दिवाळीचा रुचकर फराळ खाऊन, फटाके उडवून आनंदी दिवाळी आपण सर्वांनी मित्र मंडळींबरोबर साजरी केली असेलच. त्या बरोबर आपल्या मराठी मंडळाचा हा 'अभिरुची'चा अंक आपल्या हाती (email- ने) देताना खूप आनंद होत आहे.

दर अंकामध्ये एका सभासद कुटुंबाची ओळख करून देण्याचा प्रघात आपण यावेळीही चालू ठेवलेला आहे. या अंकात राजेश व वृषाली परब यांच्याशी गप्पागोष्टी करत त्यांची मिळालेली ओळख, अजित नातू यांनी शब्दबद्ध केली आहे. राजेश व वृषाली यांचे मनापासून आभार.

ह्या अंकात आपल्यातल्याच मित्रमंडळींच्या दिवाळीच्या आठवणी, 'कसे ते दिवस होते' ह्याला उजाळा दिला आहे. तो वाचताना आपण आपली दिवाळी कशी साजरी करायचो त्याचा जणू पुनःप्रत्यय येईल.

आपले सभासद सुहास कारके यांच्या आई (कमल कारके) यांनी केलेली "संदेश' कविता वाचताना मनाला एक उभारी येईल. ह्या कवितेबद्दल कमलताईंचे व आठवणीने ह्या अंकासाठी कविता पाठवल्याबद्दल सुहासचे मनापासून धन्यवाद!

ह्या अंकात शुभांगी केळेकर यांनी पाठवलेली एक खास पाककृती वाचलीत तर तुमच्या तोंडाला पाणी तर सुटेलच, पण असा पदार्थ करून बघण्याची खुमखुमी आली तर नवल नाही. तसेच, इतर भगिनींना अशा पाककृती पाठवायची या निमित्ताने मी आठवण करून देतो. शुभांगी केळेकर यांचे मनापासून आभार

इतर नेहमीची - शब्दकोडी, चुटके, फोटो वगैरे चवीला आहेतच. यावेळी घरगुती आरोग्य सल्लापण सुचवला आहे.

गणेशोत्सवातील वर्गणीदार सभासदांचा उल्लेख केला आहे.


तसेच आपले प्रायोजक, जाहिरातदार यांचा उल्लेख त्यांच्या जाहिरातीद्वारे केला. Our sponsors, not only contribute in terms of money, but they support us and have built an excellent relationship with our mandal and members. Many thanks to our sponsors and hoping to continue the relations.

वरील सर्व ‘contributors’चे मनापासून आभार! मीनल जोशी यांनी हा अंक तपासून चुका दुरुस्त करून दिल्या त्याबद्दल त्यांचे आभार! तसेच अंकात काही चुका झाल्या असतील तर क्षमा करावी.

मागील अंकाबद्दल प्रतिक्रिया मिळाल्या व त्याबद्दल धन्यवाद. **हा अंक वाचा व प्रतिक्रिया पाठवा हि आग्रहाची विंनंती. तसेच पुढील अंकासाठी लेख, कविता, फोटो, चुटके, आठवणी पाठवा हि विनंती.**

**धन्यवाद!**

## ओळख - राजेश व वृषाली परब.

## शब्दांकन - अजित नातू

अशीच एक मस्त संध्याकाळ अन मस्त गप्पा झाल्या तशाच मस्त परब कुटुंबाबरोबर. मी राजेशला आता जवळजवळ ९-१० वर्षं ओळखत आहे. मनात त्याची जी image आहे ती लक्षात राहील अशा हास्याची, 'दिलखुलास' व्यक्तिमत्वाची. 'दिलखुलास' अशासाठी संबोधले कारण राजेशशी बोलताना एक comfort फिलिंग असते, तो काही उगाच हातचे राखून बोलतोय असे वाटत नाही तरी संयत बोलणे व मुख्य करून सकारत्मक मोकळा स्वभाव मनात घर करून राहतो.

राजेश परब हा मुळचा मुंबईचा व नंतर लहानपणीच ठाण्याला वास्तव्य. दोन बहिणींनंतर राजेश. वयात थोडे अंतर असल्यामुळे व छोटा राजेश तसा हवाहवासा असाच असल्यामुळे म्हणा पण दोन्ही बहिणींचा अतिशय लाडका. भावंडांतील प्रेम अजूनही ताजेतवाने असेच आहे. बहिणींच्या कौटुंबिक गरजेच्या वेळी मागील वर्षी, घरात लहान मुलगा (आदी) असून, राजेश बहिणीची काळजी घेण्यासाठी तिच्याकडे गेला व सर्व नीट व्यवस्थित आहे हे बघून मगच परतला. काही वर्षांपूर्वी मी स्वतः त्याच्या मोठ्या बहिणीला भेटलो होतो तेंव्हा तिच्या बोलण्यातील राजेशबद्दलचे कौतुक, प्रेम अगदी सहजपणे आढळून येत होते. एक प्रेमळ कुटुंब जोपासण्याचा, बांधून ठेवण्याचा परब कुटुंबाचा वारसा राजेश पुढे चालवतो आहे त्यात नवल नाही. कारण तसे वडिलांनी स्वतः धडे घालून दिले होते. गावाला आजीआजोबांकडे राजेश दोन दोन महिने राहिला जायचा ते ह्या प्रेमाच्या पिढीजात सम्बधांमुळेच.

घरचे परब कुटुंब मध्यम वर्गीय. वडील गरवारे पेंटसमध्ये नोकरीला तर आई होम मिनिस्टर. पण प्रेम एव्हढे मिळत गेले कि छोट्या राजेशला कळायचे नाही कि मध्यमवर्गीय म्हणजे काय प्रकार असतो, पैशाचे बंधन कसे असते. असे नाही कि तो काहीबाही वागला किंवा उधळपट्टी केली, अवास्तव मागण्या केल्या पण चिंता नाही, सगळे चांगले चालले आहे मग काळजी कसली. कौलेजमध्ये engineering असताना पैसे यायचे घरून ते येणारच हे गृहीतच धरण्याचे ते वय. त्यात वेगळे काही नाही कारण बरीच मुले या वर्गात मोडतील, नाही का! पण एक दिवस राजेशला खरया अर्थाने उमगले की दिसते तेवढे सोपे नाही. वडिलांची गरवारे कंपनीतील संपामुळे पैसे पाठवायची चणचण, वडिलांची-आईची पराकाष्टा, एके दिवशी राजेशला समजली, पैसे हा प्रकार कळला व नकळत राजेश मोठा होऊन गेला. परिस्थितीची वास्तवता लक्षात आली. आधीचा मार्ग, वृत्ती चुकीची होती असे मुळीच नाही पण आपण कोणाचे ऋणी लागतो, आईवडील हा काय प्रकार आहे, मुलांना वाढवणे म्हणजे काय ते त्या वयात कळून गेले अन मग छान, सकारात्मक वृतीत एक ओलावापण येऊन मिळाल्यामुळे राजेशचे व्यक्तिमत्व खुलले, सर्वांगीण झाले व कुटुंबाकडे मन रमले.

तोपर्यंत थोडा वेस्टर्न टच मिळत गेलेला राजेश (फोटो खाली पहा), त्या प्रसंगानंतर कुटुंब म्हणजे काय, प्रेमळपणा म्हणजे काय हे समजून गेला. एक उमदा जबाबदार तरुण BE उतीर्ण होऊन परदेशात अनुभवासाठी, मोठे कोणीतरी होण्यासाठी व कुटुंबाला पुढे नेण्यासाठी विचार करू लागला, पावले उचलू लागला.



वडिलांकडून असा नकळत संस्कार मिळाला तर आईकडून शिकला ती धडपडीवृत्ती, काहीतरी करून दाखवायची वृत्ती, सतत गुंतून राहणे हे. का ते सांगतो. आता त्या वेळेला सर्वसाधारण स्त्रियांचे मुले, घरातील काम, फारतर नोकरी असेच जीवनमान असायचे. पण राजेशची आई ही वेगळीच. जरी कमी शिकलेली असली तरी मशीन दुरुस्त करणे, इलेक्ट्रोनिक्स मशीन उघडून कसे चालते तपासणे हे त्याची आई करायची. माझ्या माहितीत तरी असा छंद, अशी आवड नाही आली पाहण्यात. एकदा घरचे वॉशिंग मशीन बिघडले तर आईने ते स्वतः उघडले, तपासले, कुठले पार्ट्स हवे, कुठे दुरुस्त करायचे ह्याचे निदान केले, तसे पार्ट्स मिळवले वा ठोकून ठाकून तयार केले व ते मशीन पुन्हा चालू केले. Hats Off! राजेश, अरे नवल काय म्हणू, तू जर इंजीनीयर झालास तर! मानले बाबा तुझ्या आईला.

लहानपणी राजेश वेंगुर्ल्याला त्याच्या गावी जायचा ते मे महिन्याच्या सुट्टीत. त्या घराशी, त्या गावाशी जे जिव्हाळ्याचे संबध जुळले ते आजतागायत कायम आहेत. अजूनही राजेश भारतदौऱ्यावर गेला तर वेंगुर्ल्याशिवाय परत येणारच नाही. तेथील घर, वाडा आता राजेशने नीटनेटका करून घेतलाय कारण त्याला स्वतःलाच नाही तर पुढच्या पिढीला - आदि आणि साची - ह्यांनापण त्या वाड्याकडून बरेच प्रेम घ्यायचे आहे, त्या भिंतींकडून बरेच शिकायचे आहे.

एक गंमतीचा किस्सा जो राजेशची प्रवासाची आवड किती आहे ते सांगून जातो. छोटा राजेश एस. टी बसने प्रवास करताना नेहमी अगदी पुढे ड्रायव्हरच्या पाठीमागच्या सीटवर बसायला बघायचा. त्याची ड्रीम जागा म्हणजे, ड्रायव्हरच्याच्या बाजूला एक सीट असते ती. वेंगुर्ल्याला जाताना एस. टीचा प्रवास हे राजेशचे खास आकर्षण. एकदा आजी आजारी होती व परब कटुंब लगबगीने गावाकडे मुंबईहून निघाले. साधारण दहा तासांचा प्रवास. राजेश आपल्या नेहमीच्या जागी एस. टी मध्ये जाऊन प्रवासाची मजा लुटत होता. पण वाटेत पूर, पावसामुळे वाट संपूर्ण अडली होती. बस driver ने शेवटी कोल्हापूर मार्गे लांबचा मार्ग काढत काढत गावी पोहोचली ते २-३ दिवसानंतर. वडील बेचैन कारणच होते त्यांच्या आईच्या आजाराचे. पण त्या प्रवासात मात्र छोटा राजेश अति खूष कारण चक्क २-३ दिवस एस.टी त पुढे बसून प्रवासाची जी काही मजा लुटली ती राजेशला अजून काल घडल्याप्रमाणे लक्षात आहे. भाबडे मन लोभावणारे असते ते अशा मजेशीर प्रसंगामुळे पुनःप्रत्ययाला येते.

लहानपणीच राजेशला वाचनाची प्रचंड आवड निर्माण झाली. खूप खूप वाचले, मुख्यतः मराठी वाचन. वेंगुर्ल्याला 'माणिकराव' लायब्ररीत वाचन चालू होते. टारझन, फास्टर फेणे म्हणजे लहानपणीची दैवते. जयवंत दळवी हे राजेशचे

खास आवडते लेखक. राजेशला आता ह्यापुढे 'अभिरुची'साठी लिहायला लावायचा मनसुबा मी तयार केलाच आहे. कोकणातील माती, झाडे, निसर्ग याची खास आवड तसेच 'वेंगुर्ल्याचो समिंदर' ह्याच कोण वेड! म्हणूनच की काय, अस्सल निसर्गासारखा निर्मळ, 'देणारा', प्रसन्न असा राजेश तयार झाला कि काय!

दहावीत थोडक्यात बोर्डात येण्याची संधी हुकली व बारावीत सरकारी राजकारण व धोरणामुळे मुंबईत प्रवेश न मिळाल्यामुळे राजेश वारणा कॉलेजला इंजीनियरींग साठी गेला. तेथे त्याने अभ्यासाबरोबर, अनेक खेळात भाग घेत प्राविण्य मिळवले. Volleyball, hockey हे तर खेळायचाच पण पोहोण्याच्या स्पर्धांमध्ये विशेष चमक दाखवत राज्यस्तरावर पोहोचला. गावातला नैसर्गिक तलाव पट्टीच्या  स्वीमिंग पूलपेक्षा जास्त शिकवून गेला. carsची राजेशला खास आवड. तीच आवड पुढे त्याच्या मुलात - आदी - देखील आली आहे.

वृषाली मुळची गोरेगावची व कालांतराने ठाणे इथे कायम वास्तव्य. शाळा होती 'सरस्वती एज्युकेशन व पुढे डी. वाय. पाटील कॉलेज. नाकासमोर चालणारी ही मुलगी, हुशार, कलेत प्रविण. ह्या तिघी बहिणी. कणकवली गाव हे तिचे मे महिन्याच्या सुट्टीमध्ये मजा करायचे ठिकाण. आंबे, शहाळी ह्यांचा आस्वाद घेत सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेले निसर्गरम्य गाव वृषालीला दर वर्षी मुंबईहून खेचून आणायचे.

वृषालीचा आदर्श आहे ती तिची आई. पेशाने शिक्षिका असलेली तिची आई म्हणजे वृषालीचे दैवत. एक Strong, धीर देणारी, सर्व सांभाळणारी आई. घरात पूर्णपणे अभ्यासाचे वातावरण. अभ्यासूवृत्तीमुळे  इंजीनियरींगला प्रवेश मिळवायला कठीण गेला नाही. आणि इथेच जीवनाला एक turning point मिळाला. तो सविस्तर वाचूया.

राजेश व वृषाली, दोघांचे वडील गरवारे कंपनीमध्ये नोकरीला. २००२-०३च्या सुमारास दोघांची योगायोगाने ठाणे स्टेशनवर भेट झाली (म्हणूया तसे पण डेस्टिनी डेस्टिनी म्हणतात ती हीच म्हणायची नाहीतर काय!) सहज बोलता बोलता, राजेशचे वडील म्हणाले, राजेशच्या लग्नासाठी ते मुली पहात आहेत, short list करणार आणि मग राजेश, जो त्यावेळी USAत नोकरीला होता, त्याला सुचवणार. लग्नासाठी मुलगी जर पाहण्यात आली तर तुम्ही सुचवा असे त्यांनी वृषालीच्या वडिलांना सांगितले. वृषालीच्या वडिलांनीपण हो म्हटले कारण त्यावेळी वृषाली शिकत होती (BE) आणि घाई अशी काही नव्हती. पण म्हणतात ना "marriages are made in heaven" त्याप्रमाणे शेवटी वृषालीच्या घरून राजेशचे स्थळ योग्य वाटते आहे म्हणून मग वृषालीला राजेशचा फोटो बघायला दिला. आपला राजेश त्यावेळी आत्तापेक्षा जास्तच मस्त दिसायचा व वृषालीपण "नाही" म्हणाली नाही. नंतरचे गुपित असे की राजेश व वृषालीने इंटरनेटवरून एकमेकांशी बोलणी सुरु सुद्धा केली. (अरे लबाडांनो!). बहुतेक तिथेच एकत्र गाठ बांधायचा निर्णय त्यांनी घेतला असणार पण तसे कबूल नाही केले व चक्क घरच्या लोकांसाठी 'कांदेपोहे' कार्यक्रम ठरवला. बिलंदर! राजेशने ही पहिली व शेवटची मुलगी (वृषाली) बघितली (असे तो सांगतो!) व तिनेही तसेच. मजा तर पुढेच! त्या दोघांनी घरी न सांगता ठाण्याच्या सुप्रसिद्ध 'तळापाळी' तलावावर एकमेकांची भेट घेतली. त्यातही गंमत म्हणजे, वृषालीच्या मैत्रिणी चोरून ही भेट दुरून बघत होत्या. वा रे वा! 'कांदेपोहे'पण खाल्ले अन चोरून ठरवले पण! तर अशीही गंमत. प्रत्येकाच्या लग्नाच्या विशिष्ट गोष्टी असतात खऱ्या पण घरच्यांसाठी नावाला 'कान्देपोहे' हे म्हणजे 'जरा too much हं !'. फोटो पहा खाली, किती सुंदर परब पती-पत्नी, made for each other!

मग लग्न ठरले. वृषालीला आईकडून lead from front हा गुण अंगी आल्यामुळेच म्हणा, वृषालीने सर्व पुढाकार घेऊन लग्नाची सर्व कामे, प्लानिंग स्वतःच केले. इतके बारकावे की, पत्रिका कशी हवी, त्याचा format काय, रंग काय, हे सगळे सगळे मॅनेज केले. ह्याचवृत्तीने मग हल्ली नवीन घराचे backyard बनवताना हाच गुण कामी आला. घर तर विलक्षण नीटनेटके व साजेसे सजवले आहे.

राजेश वृषालीला दोघांना समाजकार्याची आवड आहे व पुढे समाजामध्ये काही करून दाखवण्याचा मानस आहे. मी त्याला म्हटले, अरे, मग मराठी मंडळ तर नवीन रक्ताचे, नवीन विचारांचे स्वागतच करेल, नक्की मंडळात समिती मध्ये पुढे मागे भाग घे. कारण मला पूर्ण विश्वास आहे की हे दोघे नक्की भलेच करतील. वृषालीला MBA वा Ph. D. करायचे आहे. ती इच्छा पूर्ण होवो. राजेशचे कारचे वेड, गिटार शिकण्याची हौस हे माहिती आहे का? शिवाय २६.३ मैलांची मॅरेथॉन त्याने यशस्वी पूर्ण केली हे तोच काय पण आम्हीही कौतुकाने सांगतो. त्याची गाण्याची आवड तर माहितीच आहे व आवाज किती मस्त आहे. मला त्याचे देवळाच्या सभागृहामध्ये गायलेले 'ढिपाडी ढिपांग' हे मराठी गीत अजूनही लक्षात आहे. तसेच गाण्याच्या शेवटी 'अन् राणी माझ्या' ह्या खर्जाच्या आवाजातले बोल पण. ह्याच वर्षी त्याने मराठी skit मध्ये 'राज ठाकरे' किती हुबेहूब वठवला होता हे पाहिलेच असेल. वृषालीमधील नृत्याची आवड व कौशल्य १६ ऑगस्टला इंडीया डेच्या कार्यक्रमात बघितली असेलच पण तसेच ह्या ८ नोव्हेंबर रोजी आपल्या दिवाळी कार्यक्रमामध्ये पण बघाल. अंगातले नवनवे पैलू परब कुटुंब दाखवत आहेत, आगे आगे देखो होता है क्या!

आईकडून नोकरी, घर, तसेच मुले वाढवणे, याचे योग्य संतुलन हा सगळ्यात मोठा वारसा, संस्कार मिळाले आहेत हे वृषाली अभिमानाने सांगते व तोच वारसा राजेशबरोबर संसाररमार्ग चालताना मुलांना वाढवताना संस्कृती, भाषा सांभाळताना आईसारखेच पुढे न्यायचा मानस, इच्छा, इर्षा, व प्रयत्न आज वृषाली करताना दिसत आहे. आता त्यांच्या जीवनात सुंदरशी दोन मुले आहेत (साची आणि आदी - फोटो पहा खाली). आता दोन घरे झाली आहेत व एकत्र HPह्या प्रख्यात कंपनीत नोकरी करतात. असे हे चौकोनी कुटुंब, राजेश, वृषालीकडे पाहताना 'made for each other' हीच भावना मनी येते. भेटला नसाल तर ह्यांना नक्की भेटा कारण असा मित्र मिळणे हे पण भाग्यच! खूप मस्त वाटेल त्यांना भेटाल तेव्हा ही मी खात्री देतो. ह्या दोघांनी असेच गुण्यागोविंदाने, आनंदाने रहावे, culture पुढे pass on करावे, मराठी भाषा मुलांना आवर्जून बोलायला शिकवावी ह्यासाठी मी त्यांना शुभेच्छा देतो व ही संध्याकाळ मस्त गप्पांमध्ये आमच्याबरोबर व्यतीत केली ह्याबद्दल राजेश अन् वृषाली यांना अनेक धन्यवाद!

## "दिवाळी आमच्या-तुमच्या आठवणीतली"

## मुलाखती व शब्दांकन - अजित नातू

आपण सर्वजण भारतातून अमेरिकेत येतो तेव्हा एक आठवणींची एक कुपी मनात ठेवून येतो. या कुपीमध्ये लहानपणापासूनच्या अनेक आठवणी ठासून भरलेल्या असतात. कुठलाही विषय निघाला की लगेच ही कुपी उघडतो आणि आपण आपली आठवण, आपले प्रसंग सांगतो. यात आईवडील, भाऊ बहिण, नातेवाईक, शिक्षक, शाळा, कॉलेज, मित्र, खेळ याबद्दल भरभरून बोलता येईल असे प्रसंग असतात. सण म्हटले तर काही विचारू नका. गणपती, दिवाळीबद्दल तर आठवणींचा डोंगरच ह्या कुपीतून निघतो. आत्ता नुकतीच दिवाळी साजरी झाली, त्या निमित्ताने, मंडळातील काहीजणांच्या अशाच आठवणी खाली देत आहोत, त्या वाचून, तुमची आठवणीची कुपी नक्की उघडेल यात शंका नाही:

रमेश पाटील (विनायकचे वडील) सांगतात:

> त्यांच्या गावात लहानपणी दिवाळीला, गायबैलांची पूजा करायचे. पणती घेऊन घरोघरी फिरायचे, त्याला लोकांनी तेल द्यायचे असते. पीकपाणी आलेले असते, त्या संपत्तीला हातभार लावण्याऱ्या गायबैलांचा मान राखतात अशी दिवाळीची पूजा करून, ओवाळून. दिवाळीत बायको नवऱ्याला, बहिण भावाला तर ओवाळतात हे माहितीच असते पण मुक्या प्राण्यांना दिवाळीला मान देऊन ओवाळण्याच्या या प्रथेचे कौतुक वाटले व मराठी संस्कृतीचा अभिमान वाटला.

तुषार लिमये त्यांची आठवण सांगतात:

> प्रत्येक दिवाळीला माती, दगड गोळा करून किल्ला करायचो. दर वर्षी काहीतरी नाविन्य त्यात आणायचे हीच ओढ, चढाओढ. मग मित्र-मित्र एकत्र येऊन कसे मिळूनमिसळून किल्ला बांधणीचे मनसुबे रचायचो, वस्तू गोळा करणे हा एक और प्रकार कारण त्यात विकत फार आणायचे नसते. किल्ला हि एक आठवण मनात ठासून आहे. गंमत म्हणजे, कष्टाने बनवलेला किल्ला, आपण स्वतःच सगळे मिळून त्यात फटाके लावून जमीनदोस्त करण्यातील मजा तर औरच.

जयनंदन कशाळकरांनी तर दिवाळीबद्दल बोलताना आठवणीचा प्रवाह समोर आणून उभा केला,

> कशाळकर कुटुंब खूप मोठे. ६ काका, त्यांचे कुटुंब व त्यांची कच्चीबच्ची. दिवाळीला चक्क एका घरात पन्नास (५०) जण कुटुंबीय एकत्र यायचे. आणि मग काही इतकी मजा यायची कि विचारू नका. बालबच्चे कंपनी अभ्यंगस्नान, फटाके, फराळखादी, खेळ यात गुंग असायची तर पुरुषमंडळी फिरायला जाणे, गप्पा मारणे अन खादी यातच वेळ घालवायची तर महिलावर्ग, कोणाला काय भेट मिळाली, खरेदी काय केली, प्रचंड काम, गप्पा, दागिने, नटणे, फराळ बनवणे यात गुंतून जायची. किती अप्रूप अशी, हवीहवीशी दिवाळी

> असायची ज्याची आता फक्त आठवणच बाकी उरी बाळगून आहोत असे बोलताना डोळ्यात कोठेतरी ओलावा दिसला खरा.

सुजाता पवार पण वरील प्रमाणेच ३०-४० जण नातेवाईक मिळून नाशिकजवळील गावी, दिवाळीला असेच एकत्र कसे भेटायचे हे सांगताना काहीतरी हातून निसटून गेले, ते लहानपणचे दिवस किंती मस्त होते हे सांगताना nostaligic होऊन जातात. आता ते एकत्र येणेपण उरले नाही व कालाय तस्मै नमः च्या ओघात त्या प्रथा संपल्या असल्यातरी इथे अमेरिकेत मित्रमंडळींसोबत त्या जवळपास जाणारे वातावरण निर्माण करायचा प्रयत्न करून जुन्या आठवणींनाच जणू जपायला पाहतात.

अशीच आठवण वैभव व प्रीती नाडगौडा सांगतात. वडिलांचे चार भाऊ व एक बहिण आणि त्याचे कुटुंब अशी २५-३० माणसे एकत्र यायची. एकत्र येऊन दिवाळीच्या निमित्ताने घर साफ करणे हे सांगताना, अजून एक विशेष व आगळी वेगळी आठवण सांगतात ती म्हणजे त्यांच्याकडे झाडूची पूजा असायची व त्या दिवसात कचरा बाहेर टाकायचा नाही. मग पर्वतीवर फिरायला जाणे, आवर्जून घरी बनवलेलाच फराळ, लक्ष्मीपूजन, फटाके हे तर आलेच. त्यातून गम्मत म्हणजे, कोठून तरी मिळवलेले आपटबार. हे जरी illegal असले तरी मिळवायचेच व ते फोडायची लहानपणाची हौस ती केव्हढी.

सुहास कारके दिवाळीची आठवण कळवतात ती एक हृद्य आठवण आपल्यापण काळजाला भिडते कारण त्यात सुहासचे, त्याच्या नातेवाईकांचे प्राण्यावरील प्रेम दिसते व डोळे ओले होतात. दिवाळीच्या निमित्ताने त्याच्याशी बोलता बोलता त्या आठवणीची कुपी कधी कशी उघडली हे सुहास भरभरून सांगतात.

> लहानपणी दिवाळी म्हटली तर चिवडा, चकल्या, करंज्या, शंकरपाळे बरोबर सगळ्या मित्रांमध्ये धमाल आनंद मिळवायचा. मी (सुहास) चौथीत असताना दिवाळीच्या आधी सुनीलदादाने एक मस्त कुत्र्याचे पिल्लू आणले. पावसाने भिजलेले ते पिल्लू आधी थोडे घाबरलेले होते पण दूध पाणी पिऊन तसे ताजेतवाने झाले. ते काळ्या रंगाचे असले तरी पायावर जणू पांढरे मोजे घातल्यागत ठसे होते. तसेच कपाळावर पांढरा टिळा तर शेपटीवर तसेच. आम्ही सर्वांनी ठरवले पिल्लाचे नाव 'मिनू'.
>
> मग घरातले वातावरणच बदलून गेले, धकाधकीच्या जीवनात घरी आनंद देणारे हे पिल्लू घरचे एक व्यक्तिमत्वच झाले. शाळेत जाताना माझे बालमन दुःखी व्हायचे व शाळेतून कधी घरी येऊन 'मिनू' पिल्लाशी खेळतो असे व्हायचे.
>
> एकदा असचं दोन दिवसांनी दिवाळी होती. संध्याकाळचा अंधार झाला होता, आई फराळ बनवत होती, 'मिनू' पिल्लू सुनील दादाच्या पायावर तोंड ठेवून बसली होती. tv वर गाणे सुरु होते. इतक्यात, 'धडामधूम' प्रचंड मोठा आवाज! बाहेर दिवाळीचे 'सुतळी बॉम्ब' फुटले. कानठळ्या बसतील असे आवाज अचानक झाले. आम्ही मुले 'दिवाळी आली' अशा आरोळ्या ठोकत उड्या मारत बाहेर पडलो.
>
> थोड्यावेळाने घरी येऊन सर्व फराळाला एकत्र आले, जेवायला घेतले. पण अरे 'मिनू' पिल्लू कोठे आहे असे सर्व म्हणायला लागले पण पिल्लाचा पत्त्ताच नाही. कोठे बरे गेले? मग सर्वजण तसेच पिल्लाच्या शोधात,

पण 'मिनू' गायब. साद घातली, भुंकण्याचा आवाज करून बघितले, पण पत्ता नाही, भूक लागल्यावर लडीवाळपणे शेपटी हलवत पिल्लू व्हीव्हळत यायची त्याचापण मागमूस नाही. मग शेवटी 'torch' घेऊन खाटेखाली-अडगळीतल्या सामानात पिल्लाचे डोळे चमकले. मिनुपिल्लू फटाक्यांच्या आवाजाने अतिघाबरून बिचारे लपून थरथरत होते.

तेंव्हापासून फटाक्यांचा लहान असून कोणी हट्ट केला नाहीच नाही पण नाव पण घेतले नाही. अजूनही इतक्या वर्षांनी डोळ्यासमोर फटाके म्हटले कि भीतीने थरथर कापणारी 'मिनू' येते. कोठे गेली ति निरागस दिवाळी, अन कोठे असेल मन जिंकून घेणारी मिनू!



## कविता - संदेश

### - कवयित्री श्रीमती कमल कारके (सुहास कारके यांच्या मातोश्री)

आळसाची जळमटे टाका दूर झटकून
मनापासून काम करावे मंत्र देते हटकून
देता स्वविचारा चालना, बुद्धी जाईल चमकून
पाहता तुमचे ध्यान जग जाईल हबकून

कर्तुत्वाने उंचवा भारत मातेची शान
उत्कर्षाचा मिळेल मग तुम्हाला मान
खूप वाचा, लिहा, चांगले ऐका जाणून
शोधाच्या या कार्याने, सुख मिळेल जगाला
अभ्यासाचा कानमंत्र देते मी तुम्हाला

अंतरीच्या ज्ञानदिपाने अज्ञाना पिटाळा
त्या कीर्तीच्या कळसा चढू द्या आभाळाला
यशवन्ताच्या माळा पडतील मग तुमच्या गळा
नका करू कधीही दुष्टांच्या नकला
अभ्यासाचा कानमंत्र देते मी तुम्हाला

विनंती करते देवा तव चरणी,
बुद्धी दे भरपूर माझ्या विद्यार्थींना
संदेश देते मी विद्यार्थीनो तुम्हाला
जागरूक ठेवा तुम्ही गुरुशिष्य नात्याला,
अभ्यासाचा कानमंत्र देते मी तुम्हाला

## पाककृती (रेसिपी)

### - शुभांगी केळेकर (she credited तिची आई)

**पदार्थ - खोबऱ्याचे रवा लाडू**

**साहित्य**


- ४ कप रवा
- २ कप ताजे खोबरे (फ्रोझन नको)
- ३ कप साखर
- दीड कप दुध
- अर्धा कप तूप
- कापलेले बदाम, चारोळी
- वेलची पूड
- केशर दांड्या थोड्या

**पाककृती**

- २० मिनिटे, मध्यम ग्यासवर रवा तुपात शेकून घ्या. त्याचा रंग तपकिरी होणार नाही याची काळजी घ्या कारण हे लाडू पांढरे दिसले पाहिजे. तरी रवा चांगला शेकणेपण महत्वाचे.
- मग ताजे खोबरे (ओले) त्यात टाका व पुन्हा साधारण १० मिनिटे शेका.
- एका कढईसारख्या भांड्यात दुध, साखर गरम करा आणि syrup सारखे होईपर्यंत उकळवा. ८-१० मिनिटानंतर ग्यास बंद करा.
- त्यात वरील रव्याचे मिश्रण व वेलची पूड घाला व चांगले ढवळा (डोसा batter सारखे दिसले पाहिजे)
- जोपर्यंत रवा एकजीव होईपर्यंत गरम करटा रहा, ढवळा. २ तास मग गार होऊन द्या. मात्र हे मिश्रण कोरडे होणार नाही याची काळजी घ्या.
- हाताने मिश्रण रगडून घ्या. कोरडे वाटले तर थोडे दुध घाला व मिश्रण एकजीव करा. हाताने गोल लाडू वळा
- ओले, ताजे खोबरे असल्याने refrigeratorमध्ये ठेवा. खायच्या आधी थोडा वेळ बाहेर ठेवा म्हणजे थोडे उष्ण होऊन आणखी चांगले लागतील.

लाडू करून बघा अन कसे झाले आहेत ते कळवा.
अधिक माहितीसाठी शुभांगीचा संपर्क ई-पत्ता आहे (kelekars@yahoo.com).

## शब्दकोडे



**आडवे शब्द** – (१) क्रमाक्रमाने, हळूहळू (५) साद (७) संयोग, संबोध (१०) तमाशातील मुख्य कथानक (११) सैतानी वारा (१२) नदीच्या पात्रात पाण्यासाठी खोदलेला खड्डा (१४) तात्पर्य, सारांश (१५) खच्चून भरलेले वाहन (१७) एकाच काळातील; जवळजवळ सारख्या बयाचे (१८) रोखलेली नजर (२०) पलीकडे; दूर (२१) धातूचा दोरा (२२) देवताचर्णाचा दिवस (२३) राठ, कडक (२५) दुष्टाव्याचे वर्तन (२७) निर्णय करण्यासाठी जमलेल्या लोकांची बैठक (२९) अजगर (३१) मध्यम प्रतीचा (३३) जाणतेपणी वा अजाणतेपणी (३४) एक ऋषिधान्य

**उभे शब्द** – (१) आळशी; निश्चित धोरण नसलेला (२) दृष्टीची दिशा (३) सैन्याचा दाणागोटा (४) कोर्टात गुदरलेला खटला (६) एकाच रंगाची गाय (८) ढगाळ आकाश (९) अडचण, घोटाळा (११) नेमाने तीर्थक्षेत्रास जाणारा (१३) बाजू; कैवार (१४) आपल्या बाजूने वळविण्याच्या उपायातील पहिला (१६) काही शिजण्याचा आवाज (१७) चिता (१९) युद्धभूमी (२०) पटुता, कौशल्य (२१) उग्र प्रकृतीचा (२२) साध्वी स्त्री (२४) मर्दानी खेळ, व्यायाम (२६) ज्यात काही स्वारस्य नाही असे, पाणचट, बेचव (२८) तक्ता; वाफा (२९) तोहमत (३०) कावळा (३१) रजनी (३२) न सोडण्याच्या मिषाने अंगीकारलेले व्रत

## चुटके, उखाणे, आरोग्य सल्ला

### १) अभिमानी संता

**संता:** मला किती अभिमान आहे, माझा मुलगा मेडीकल school मध्ये आहे.

**बंता:** खरेच! काय study करतोय!

**संता:** नाही, तो नाही, त्याचाच ब्रेन कॉलेजची लोक अचंबित होऊन study करत आहेत

### २) काय कल्पना तरी केलीत या उत्तराची?

सरदार औषधाच्या गोळ्या (capsules) घेताना sides कात्रीने कापून मग उरलेली का घेतो बर?

विचार करा! अजून विचार करा! अजून अजून.................

...............................................> *To avoid side effects!!!*

### उखाणा

होते लग्नात अभिमानी त्याला घास भरवताना
आहे ‘अमुक’रावांची अभिमानी, तो भांडी घासताना

### आरोग्य सल्ला:

**Anemia (लाल रक्त पेशींचा कमीपणा) वर घरगुती उपाय**

- काळ्या मनुका (raisins) रात्रभर पाण्यात भिजवून, सकाळी रिकाम्या पोटी महिनाभर घ्या.
- काळ्या तिळाचे चूर्ण करा आणि दररोज सकाळी २ चमचे हे चूर्ण आणि अर्धा कप कोमात पाण्याबरोबर घेत चला.
- रोज २-३ खारीक खाल्ल्या तर मदत होईल.
- C जीवनसत्व लोहयुक्त (iron) पदार्थ पचनासाठी शरीराला आवश्यक आहे. त्यासाठी हिरव्या पानाच्या भाज्या, rice flakes (ज्यात लोह असते) यावर थोडे लिंबू पिळत जा.

**फोटो section कंदील workshop** - खूपच चांगला प्रतिसाद व छान कंदील बनविले.

मदतीबद्दल शुभांगी कोन्नुर, पल्लवी सावंत, मीनल जोशी, वैशाली आदेत्तिवार, अमोल जोशी यांचे आभार!



















**गणेशोत्सावामध्ये सढळ हस्ते वर्गणी देणारे खालील प्रमाणे**

| | |
|---|---|
| • सतिश व वैशाली आदेत्तिवार<br>• शेखर व शुभांगी चिटणीस<br>• पृथ्वीराज व मनिषा होतपेटी<br>• अमीत व सोनाली जोशी<br>• श्रीकांत व प्रिया जोशी<br>• वैभव व प्रीती नाडगौडा<br>• विनायक व जयश्री पाटील<br>• अमर व सुजाता पवार<br>• अमेय व तृप्ती साठे<br>• आशुतोष व माधुरी शिरोळकर<br>• आनंद व आरती मेहेर<br>• मंदार व डिंपल निमकर<br>• विक्रांत व पल्लवी सावंत<br>• विक्रम व अस्मिता बोबडे<br>• अमिता खरे (मेहंदी स्टॉल नफा)<br>• पल्लवी धुमाळ (मखर सजावट)<br>• धनंजय खरे व राजश्री देशपांडे (मराठी शाळा स्टॉल नफा)<br>• संदीप शेठ<br>• गणेश जंगम<br>• नमिता सुर्वे | • सुशांत शिरोडकर<br>• विजय वाकोडे<br>• फारुकी सविता<br>• अब्दुल सिमसॉफ्ट<br>• नितीन पाटील<br>• सुहास कारके<br>• नितीन पराडकर<br>• राजीव अगरवाल<br>• शिवाजी पवार<br>• वृषाली पाखले<br>• राजेंद्र शेळके<br>• नयन प्रधान<br>• कविता राव<br>• अनिकेत ब्रीद<br>• महेश केतकर<br>• उमा कुलकर्णी<br>• अजिता निमकर<br>• बी. लाठी<br>• प्रीती नरे<br>• सचिन ब्रह्मे |

# आपले प्रायोजक - जाहिरातदार

# (Our Sponsors)

## Platinum sponsors




California IVF Fertility Center
In Collaboration with UC Davis Health System
Offices in Sacramento and Davis
Fertility Testing and Treatment
IVF, ICSI, and Inseminations
Tubal Reversal Surgery
Vasectomy Reversal
Genetic Testing of Embryos
PGD/PGS
Family Balancing (Boy or Girl)
Egg Donation Program
Donated Embryos
(530) 771-0177
www.CaliforniaIVF.com

# KIFS Kotwal Insurance & Financial Services

***People don't plan to fail, They just fail to plan***

When it comes to happy retirement, key is to plan well.

**Dear Friend,**

**Just Half an Hour with Me Can HELP you:**

- Plan for your children's college education
- Generate a **tax free** income from retirement till age 100
- Roll over your orphan IRAs and 401 Ks into meaningful, secure investment for guaranteed retirement income.
- Select a right insurance policy to cover your **mortgage** fully in case of death
- Reevaluate your existing insurance policy free of cost and if necessary suggest a better policy that will give you life coverage and completely tax free retirement income

In short, help you with planning all aspects of your financial life. Please call

**Ray Kotwal, MBA Finance**

**Life Insurance and Planning Specialist**

**Insurance License No. OH12645**

Remember **KIFS** for all your financial needs

Kotwal Insurance & Financial Solutions

www.raykotwal.biz raykotwal@hotmail.com


mithai4all
Your Shop Away From Home
Celebrate Diwali with Mithai4all
Send mithai gifts to your parents, friends & relatives in India.
Order mithai online & get it home delivered
We also deliver to US, UK, Canada, Singapore, Australia and 10+ countries

PNG Jewelers Inc.
Since 1832
www.pngjewelers.com